| | | |
|---|---|---|
| MHSN030023352018 | दाखल दिनांक | २१.०६.२०१८ |
| | नोंदणी दिनांक | २७.०६.२०१८ |
| | निकाल दिनांक | ३०.०३.२०२६ |
| | कालावधी | वर्षे महिने दिवस<br>०७ ०९ ०९ |

| | | |
|---|---|---|
| | | **न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, सांगली यांचे न्यायालयात**<br>**(पिठासीन न्यायाधीश ओंकार सं. शास्त्री)**<br>न्यायनिर्णय घोषित दिनांक – ३०.०३.२०२६<br>**नियमित फौजदारी खटला क्र.२४२/२०१८**<br>**निशाणी क्र.** |
| | | गु.र.नं.३४/२०१७, सांगली ग्रामीण पोलीस स्टेशन, सांगली, जि. सांगली |
| फिर्यादी/तक्रारदार | | महाराष्ट्र शासन,<br>मार्फत पोलीस निरीक्षक,<br>सांगली ग्रामीण पोलीस स्टेशन, सांगली. |
| अभियोग पक्षामार्फत | | सहाय्यक सरकारी वकील श्री. एम. डी. बागल |
| आरोपी | १. | **उत्तम वसंत मोरे**<br>वय– ४१ वर्षे, धंदा– व्यापार,<br>रा. दुधगाव, ता. मिरज, जि. सांगली |
| | २. | **सुनिल वसंत मोरे**<br>वय– ३८ वर्षे, धंदा– व्यापार,<br>रा. दुधगाव, ता. मिरज, जि. सांगली |
| | ३. | **विजय गणपती तावदरकर**<br>वय– ५१ वर्षे, धंद– शेती, |

| | | |
|---|---|---|
| | ४. | रा.कवलापूर, ता. मिरज, जि. सांगली<br>**युवराज तुकाराम तावदरकर (मयत)** |
| आरोपी क्र.१ व २ तर्फे<br>आरोपी क्र.३ तर्फे | –<br>– | विधीज्ञ श्री. एन. बी. कोळेकर<br>विधीज्ञ श्री. व्ही. एन. सावंत |

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | २१.०३.२०१७ |
| फिर्याद दाखल दिनांक | २५.०३.२०१७ |
| दोषारोपपत्र पाठविल्याचा दिनांक | २१.०६.२०१८ |
| दोषारोप निश्चित केल्याचे दिनांक | १७.१०.२०२३ |
| पुरावा सुरू झाल्याचा दिनांक | ०७.०८.२०२४ |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखून ठेवल्याचा दिनांक | --- |
| न्यायनिर्णय दिनांक | ३०.०३.२०२६ |
| न्यायनिर्णयातील शिक्षेसंदर्भात आदेशाचा दिनांक | निरंक |

## <u>आरोपीची माहिती</u>

| अ. क्र. | आरोपीचे नांव | आरोपीस अटक दिनांक | आरोपीस जामिनावर खुले केलेचा दिनांक | दोषारोपातील कलम | आरोपीस दोषमुक्त किंवा दोषसिध्द केले | आरोपीस झालेली शिक्षा | आरोपीने संपरिक्षे दरम्यान भोगलेली शिक्षा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | उत्तम वसंत मोरे | ०५.०४.२०१७ | ०८.०४.२०१७ | भारतीय दंड विधान कलम ४५४, ३८० सह कलम ३४ | निर्दोष मुक्त | निरंक | निरंक |
| २. | सुनिल वसंत मोरे | ०५.०४.२०१७ | ०८.०४.२०१७ | | | | |
| ३. | विजय गणपती तावदरकर | ०५.०४.२०१७ | ०८.०४.२०१७ | | | | |
| ४. | युवराज तुकाराम तावदरकर (मयत) | --- | --- | --- | --- | --- | --- |

## न्यायनिर्णय

## (घोषित दिनांक ३०.०३.२०२६)

सदरहू खटला आरोपींविरुद्ध भारतीय दंड विधानाचे कलम ४५४, ३८० सह कलम ३४ अन्वये शिक्षेस पात्र अपराधासाठी चालविण्यात आला.

२. **अभियोग पक्षाचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे आहे** –

फिर्यादी गितांजली उत्तम मोरे यांनी फिर्याद दिली की, आरोपी क्र. १ हा त्यांचा पती असून तो चंदननगर, पुणे येथे राहण्यास आहे. त्या दोघांमध्ये दीड ते दोन वर्षापासून घरगुती कारणावरून वाद झाल्याने फिर्यादी या दोन मुलांसह दुधगाव येथे विभक्त राहण्यास आहे. त्यांनी दुधगाव येथे सुशिला आण्णा कोल्हे यांचे घरात भाड्याने रूम घेऊन सुमारे ११ महिन्यापूर्वीपासून लघुउद्योग चालू केला आहे. दि. २१.०३.२०१७ रोजी त्या पुणे येथे न्यायालयीन कामानिमित्त गेल्या असताना संध्याकाळी ०६.०० वाजता त्यांची मुलगी पायल हिचा फोन आला की तिचे वडील म्हणजेच आरोपी क्र. १ व इतर व्यक्तींनी त्यांच्या मशीनीच्या दुकानाचे कुलूप तोडून मशिनच्या मोटारींच्या वायर तोडून साहित्य घेऊन चालले आहेत, तू लवकर ये, असे तिने सांगितले. त्यावर त्यांनी मुलीला शंभर नंबरला फोन लावून कळव, मी निघते असे सांगून रात्री ०१.०० वाजता घरी येऊन पाहिले असता व त्याबाबत त्यांच्या आईकडे चौकशी केली असता फिर्यादीच्या आईने सांगितले की फिर्यादीचा

पती म्हणजेच आरोपी क्र. १ व इतर आरोपी यांनी घराचे कुलूप तोडून साहित्य चोरून नेत असताना शेजारी संगिता रमेश राठोड व शांतीनाथ गुंडा सुतार यांनी काय करताय असे विचारले असता मी तिचा नवरा आहे व माझ्याकडे कोर्टाची ऑर्डर आहे हे साहित्य मी घेऊन चाललो आहे असे म्हणून खालील वस्तू चोरून नेल्या त्याचे वर्णन पुढीलप्रमाणे–

१. ४०००/– रू. मिरची कांडप डंगाचे मोटार व दोन बेल्ट,

२. ७०००/– रू. खारीक खोबरे बारीक करण्याची मशीनची मोटार ३ एचपी व ब्लेड,

३. ४०००/– रु. पिटाचे चक्कीच्या जाळ्या व ब्लेड,

४. ४०००/– रू. पापड पीट मळणी मशीनचे पीट मळायचे भांडे व मोटर व पापड लाटणेचे मशीनचा पट्टा कापून त्याची चेन,

५. १०००/– रू. वजन काटा इलेक्ट्रिकल,

६. ५००/– रू. मिक्सर

असे वर नमूद लघुउद्योगाचे मशीनचे साहित्याची चोरी केल्याने फिर्यादी यांनी सांगली ग्रामीण पोलीस ठाणे येथे आरोपींविरुद्ध फिर्याद दिली.

३. फिर्यादीच्या फिर्यादीवरून सांगली ग्रामीण पोलीस स्टेशनला भारतीय दंड विधानाचे कलम ४५४, ३८० सह कलम ३४ अन्वये गुन्हा क्र.४०/२०१८ नोंदविण्यात आला. प्रकरणाचा तपास श्री. एस. पी. बोंद्रे, पोलीस हेड कॉन्स्टेबल ४७५ यांनी केला. तपासामध्ये साक्षीदारांचे बयान नोंदविले घटनास्थळ व जप्ती पंचनामा केला व आरोपींना अटक केली. त्यानंतर तपास पूर्ण करून दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले.

४. आरोपींविरुद्ध निशाणी क्र.२७ प्रमाणे भारतीय दंड विधानाचे कलम ४५४, ३८० सह कलम ३४ अन्वये दोषरोप निश्चित केला. तो आरोपींना वाचून व समजावून सांगण्यात आला असता त्यांनी गुन्हा केल्याचे नाकारले व संपरिक्षेची मागणी केली. आरोपींविरुद्ध कोणतेही तथ्य अभिलेखावर न आल्यामुळे त्यांचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ नुसार निवेदन नोंदवणेत आले नाही.

५. अभियोग पक्षाच्या कथनावरून माझ्या अवलोकनार्थ खालीलप्रमाणे वादप्रश्न उपस्थित झाले असून त्यावर मी माझे निर्णय कारणमिमांसेसहित खालीलप्रमाणे देत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने पुढे असे सिद्ध केले काय की, दिनांक २१/०३/२०१७ रोजी सायंकाळी १८.०० वाजण्याच्या | |

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| | सुमारास आरोपी यांनी आपसात संगनमत करुन फिर्यादी यांच्या भाड्याने घेतलेल्या घराचे कुलूप तोडून फिर्यादी यांच्या संमतीशिवाय चोरी करण्याच्या उद्देशाने गृहअतिक्रमण केले व त्यायोगे **भारतीय दंड संहितेचे शिक्षापात्र कलम ४५४ सह कलम ३४** प्रमाणे गुन्हा केला? | **नाही.** |
| २. | अभियोग पक्षाने हे सिद्ध केले काय की, वर नमूद तारीख, वेळी व ठिकाणी आरोपी यांनी यांनी समान हेतूने फिर्यादी यांचे संमतीशिवाय मुद्दाम, लबाडीने त्यांचे भाड्याने घेतलेल्या घराचे कुलूप तोडून फिर्यादीच्या मालकीचे एकूण रक्कम रू. २०,५००/- चा माल चोरून नेले व त्यायोगे **भारतीय दंड संहितेचे शिक्षापात्र कलम ३८० सह कलम ३४** प्रमाणे गुन्हा केला? | **नाही.** |
| ३. | **काय आदेश ?** | **अंतिम आदेशाप्रमाणे.** |

## <u>कारणमीमांसा</u>

**सरकारपक्षातर्फे देण्यात आलेले साक्षीदार :**

| क्रमांक | नाव | निशाणी क्रमांक | पुराव्याचे स्वरूप |
|---|---|---|---|
| १. | वैभव आप्पासाहेब माने | ३५ | निवेदन पंचनाम्यावरील पंच |
| २. | जावेद बाबू मानेखान | ३७ | घटनास्थळ पंचनाम्यावरील पंच |

**अभियोगपक्षातर्फे कागदोपत्री पुरावा :**

| अनुक्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | पी–१ | साक्षीदार क्र. १ यास प्राप्त झालेले साक्षी समन्स. |
| २. | वस्तू 'अ' व 'ब' | निवेदन पंचनाम्यावेळी काढलेली छायाचित्रे |

**<u>मुद्दे क्र.१ व २ बाबत–</u>**

६. सदर मुद्दे एकमेकांशी निगडित असल्याने व पुराव्याची पुनरावृत्ती टाळण्यासाठी त्यांचे एकत्रितपणे अवलोकन करण्यात येत आहे. **साक्षीदार क्र.१ वैभव माने** हे निवेदन पंचनाम्यासंबंधातील पंच आहेत. त्यांनी त्यांचे पुराव्यात असे कथन केले आहे की, दि. ०७.०४.२०१७ रोजी आरोपींनी त्यांचेसमक्ष कोणतेही निवदेन दिले नाहीत. ते पोलिसांसोबत घटनास्थळी म्हणजेच नलवडे गल्ली, कवलापूर येथे गेले होते. परंतु असे काही घडले नाही की गणपत तावदरकर यांच्या घराशेजारी पत्र्याच्या शेडमध्ये बारदानाखाली लपवलेल्या वस्तू आरोपींनी काढून दिल्या व त्याप्रमाणे पोलिसांनी पंचनामा केला. सदर साक्षीदाराने आपल्या पूर्वकथनास विसंगत अशी साक्ष दिल्याने सरकारी वकिलांनी त्यास भारतीय पुरावा कायदा कलम १५४ अन्वये विस्तृत स्वरूपात उत्तरसूचक प्रश्न विचारले. परंतु त्या सर्वांची त्याने नकारार्थी उत्तरे दिली. तसेच सदर साक्षीदाराने निवेदन पंचनाम्यावरील त्याची सही देखील अमान्य केली. सदर साक्षीदाराच्या साक्षीमधून पोलिसांनी त्याला दिलेल्या साक्षीसमन्सला निशाणी पी–१ व अभिलेखावरील तथाकथित निवेदन

पंचनाम्यावेळीच्या छायाचित्रांना अनुक्रमे वस्तू 'अ' व वस्तू 'ब' देण्यात आले.

**७.** साक्षीदार क्र. २ हे देखील तथाकथित घटनास्थळ पंचनाम्यावरील पंच आहेत. त्यांचे नाव अभियोगपक्षाने घटनास्थळ पंच म्हणून दोषारोपपत्रात सामील केले असले तरी त्यांनी शपथेवर घटनास्थळ पंचनाम्यावरील त्यांची सही नाकारली. तसेच दि. २६.०३.२०१७ रोजीच्या घटनास्थळ पंचनाम्यामधील मजकूर देखील माहिती नसल्याचे कथन केले. सदर साक्षीदाराला देखील सहाय्यक सरकारी वकिलांनी विस्तृत स्वरूपात उलटतपास घेऊन त्यास उत्तरसूचक प्रश्न विचारले. परंतु त्यामध्ये देखील अभियोगपक्षास सहाय्य करणारा कोणताही उल्लेख न्यायालयासमोर येऊ शकला नाही. सदर साक्षीदारांव्यतिरिक्त इतर साक्षीदारांना वारंवार साक्षी समन्स काढले गेले. त्यापैकी काही साक्षी समन्स बजावूनदेखील न्यायालयासमोर हजर झाले नाहीत. तर काही मिळून येत नसल्याबाबत पोलिसांचा अहवाल न्यायालयास प्राप्त झाला. ते सर्व अहवाल अभिलेखावर दोषारोपपत्रासोबत जोडण्यात आले. त्याचबरोबर आरोपीने निशाणी ४६/१ कडे फिर्यादीचा मृत्यूदाखला मूळ स्वरूपात हजर केला. त्यावर ग्रामपंचायत बुधगाव यांचा सहीशिक्का असल्याने सदर दाखल्यावर अविश्वास ठेवण्याचे कारण दिसून येत नाही. तसेच आरोपी क्र. १ हा फिर्यादीचा पती असल्याने फिर्यादीचा मृत्यूदाखला त्याने न्यायालयासमोर दाखल करणे यामध्ये काही आक्षेपार्ह नाही. सदर मृत्यू

दाखल्यावरून फिर्यादी ही दि. ०५.०८.२०१७ रोजीच मयत झालेली दिसून येते. सदर मृत्यूदाखला प्राप्त झाल्यावर फिर्याद व इतर महत्त्वाच्या कागदपत्रांना निशाणी देण्यासाठी दाखल अंमलदार व तपासी अंमलदार यांना वारंवार साक्षी समन्स काढले गेले. परंतु त्या दोघांपैकी कोणीही न्यायालयासमोर साक्ष देण्यासाठी उपस्थित झाले नाहीत. त्यामुळे अभियोगपक्षाची सर्व महत्त्वाची कागदपत्रे म्हणजेच फिर्याद, घटनास्थळ व जप्ती पंचनामा तसेच निवेदन पंचनामा इत्यादी सिध्दतेच्या नियमांप्रमाणे शाबीत होऊ शकले नाहीत. त्यामुळे त्या सर्वांमधील मजकूर न्यायालयासमोर कोणत्याही साक्षीदाराच्या शपथेवरील सरतपासाद्वारे येऊ शकलेले नाही. त्यामुळे आरोपी क्र. १ ते ४ यांनी दि. २१.०३.२०१७ रोजी सायंकाळी ०६.०० वाजण्याच्या सुमारास संगनमत करून फिर्यादीने भाड्याने घेतलेल्या घराचे कुलूप तोडून आत प्रवेश करून फिर्यादीचे एम.आर.क्र. २१/२०१७ अन्वये जप्त केलेले लघुउद्योगाचे साहित्य चोरून नेले ही बाब संशयापलीकडे जाऊन सिध्द होऊ शकलेले नाही. त्यामुळे संशयाचा फायदा आरोपींना देऊन त्यांना भा.द.वि.कलम ४५४, ३८० सह कलम ३४ प्रमाणेच्या गुन्ह्यातून निर्दोष मुक्त करणे न्यायोचित ठरते. त्याचवेळी एम.आर. क्र. २१/२०१७ अन्वये जप्त करण्यात आलेले लघुउद्योगाचे सर्व साहित्य हे किंमती मुद्देमाल स्वरूपातील असल्याचे दिसून येते. परंतु फिर्यादी ही मयत झालेली असल्याने सदरचे साहित्य अद्यापी हक्कदार

व्यक्तीला परत केले नसल्यास ते आरोपी ऐवजी फिर्यादीची मुलगी म्हणजेच कु. पायल उत्तम मोरे हिला परत देणे योग्य ठरेल. सदर साहित्यावर तिने हक्क न सांगितलेस अगर ती मिळून न आल्यास सदर साहित्याची जाहीर लिलाव करून विक्री करण्यात यावी व त्यातून येणारे उत्पन्न सरकारजमा करण्याचा आदेश पारित करणे गरजेचे ठरते. **म्हणून मी मुद्दा क्र.१ व २ चे निष्कर्ष नकारार्थी देत आहे.**

**मुद्दा क्र.३ बाबतः–**

८. मुद्दे क्र.१ व २ यांचे निष्कर्ष मी यापूर्वीच नकारार्थी दिलेले आहेत. अभियोग पक्षाला आरोपींनी भारतीय दंड विधानाचे कलम ४५४, ३८० सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला हे सिद्ध करता आले नाही. म्हणून आरोपी हे निर्दोष सोडण्यास पात्र आहेत. सबब, मुद्दा क्र.३ च्या उत्तरासाठी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१. **आरोपी क्र.१ उत्तम वसंत मोरे व आरोपी क्र.२ सुनिल वसंत मोरे** यांना फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २४८(१) प्रमाणे भारतीय दंड विधानाचे कलम ४५४, ३८० सह कलम ३४ अन्वये शिक्षापात्र गुन्ह्यांतून निर्दोष मुक्त करण्यात येत आहे. आरोपी क्र. ३ विजय गणपती तावदरकर व आरोपी क्र. ४ युवराज तुकाराम तावदरकर हे मयत झाल्याचे अभिलेखावरून दिसून येत असल्याने त्यांच्याविरूध्द कोणतेही आदेश पारित करण्यात आलेले नाही.

२. आरोपींचा वैयक्तिक जातमुचलका रद्द करण्यात येत आहे.

३. आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४३७–अ प्रमाणे र.रु.१५,०००/– रुपयाचे प्रत्येकी वैयक्तिक बंधपत्र व तेवढ्याच रकमेचा जामीन द्यावा.

४. एम.आर. क्र. २१/२०१७ अन्वये जप्त करण्यात आलेले लघुउद्योगाचे सर्व साहित्य हे किंमती मुद्देमाल स्वरूपातील असल्याचे दिसून येते. परंतु फिर्यादी ही मयत झालेली असल्याने सदरचे साहित्य अद्यापी हक्कदार व्यक्तीला परत केले नसल्यास ते आरोपी ऐवजी फिर्यादीची मुलगी म्हणजेच कु. पायल उत्तम मोरे हिला परत देणे योग्य ठरेल. सदर साहित्यावर तिने हक्क न सांगितलेस अगर ती मिळून न आल्यास सदर साहित्याची जाहीर लिलाव करून विक्री करण्यात यावी व त्यातून येणारे उत्पन्न सरकारजमा करण्यात यावे.

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित)**

ONKAR SANJAY SHASTRI

Digitally signed by ONKAR SANJAY SHASTRI
Date: 2026.03.30 17:17:09 +0530

**सांगली** **(ओंकार सं. शास्त्री)**

**दिनांक–३०/०३/२०२६** **न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,सांगली**

**(न्यायालय क्र.५)**